बंधपत्रित सेवा न करणे हे महाराष्ट्र वैद्यकीय परिषद कायदा, १९६५ अंतर्गत अनैतिक वागणूक (निती संहितेचा भंग) या सदराखाली समजून त्याबाबत कारवाई करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन परिपत्रक क्रमांक एमएमसी-०८१६/प्र.क्र.३३/अधिनियम
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ०५/०१/२०१७.

**वाचावे :-**

१) बंधपत्रित सेवा शासन निर्णय क्रमांक एनओसी-३०९५/सीआर-३०७/९५/शिक्षण-१, दिनांक २८.२.१९९६.

२) बंधपत्रित सेवा शासन निर्णय क्रमांक एमईडी-१००७/सीआर-४९०/०७/शिक्षण-२, दिनांक ०८.०२.२००८.

३) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांचे क्र.सवैशिवस/मवैपका/बंधपत्रित/८-अ/७९५/२०१६, दि. १६.०७.२०१६.

**परिपत्रक :-**

शासनाच्या दि. २८.२.१९९६ व दि. ८.२.२००८ च्या शासन निर्णयानुसार बंधपत्रित सेवा करणे शासनाच्या /महापालिका रुग्णालयातून वैद्यकीय पदवी/ पदव्युत्तर पदवी अर्हता प्राप्त करणाऱ्या उमेदवारांना आवश्यक आहे. मात्र त्याचे पालन होत नाही. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या दि. ११ मार्च, २००२ च्या अधिसूचनेचा चॅप्टर-१ (Code of Medical Ethics) मधील १.९ नुसार वैद्यकीय व्यवसायिकांनी राज्य शासनाचे नियम पाळावेत असे बंधनकारक आहे. बंधपत्रित सेवा न केल्यामुळे उक्त अधिसूचनेतील ७.१ नुसार सदर कृती ' मिसकंडक्ट ' या सदराखाली येते. त्यामुळे अशा व्यवसायिकांवर महाराष्ट्र वैद्यकीय परिषद कायदा, १९६५ च्या कलम २२ (१) नुसार कार्यवाही करण्यासाठी अशा व्यक्तींच्या नोंदणीचे नुतनीकरण करण्यात येवू नये असे प्रबंधकांना कळविणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांना बंधपत्रित सेवा न करणाऱ्या विदयार्थ्यांवर महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ च्या नियम २२ (१) मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेला संबंधीतांची नावे प्रस्तावित करण्यासाठी ' नोडल अधिकारी ' म्हणून घोषित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमार्फत अशा प्रस्तावित करण्यात आलेल्या विदयार्थांसंदर्भात योग्य तरतूदीविचारात घेऊन विहित प्रक्रियेद्वारे सदर प्रकरणी भारतीय आर्युविज्ञान परिषदेच्या नियमावलीनुसार 'Misconduct' **(निती संहितेचा भंग) समजून नियम २२ नुसार संबंधितांवर कारवाई करावी.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(शिवाजी पाटणकर)
सह सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
मा. राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गो.ते.रुग्णालय कंपाऊड, १० वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
मा. प्रधान सचिव (वै.शि.) यांचे स्वीय सहाय्यक, गो.ते.रुग्णालय कंपाऊड, ९ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
मा. प्रबंधक, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई.
मा. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
सर्व उपसचिव/अवरसचिव /कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग.
अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई.
निवडनस्ती (अधिनियम)